**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.२७३ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.भरतकुमार पी. देवलासी,
४, पद्मसौरभ कॉलनी, शेगांव रोड,
अमरावती.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विदयुत निरीक्षक, सचिव, अनूज्ञापक व उद्वाहन निरीक्षक,
उदयोग, उर्जा व कामगार विभाग, अंधेरी (पश्चिम) मुंबई- ५८.
२. जन माहिती अधिकारी तथा
शाखा अभियंता, सचिव, अनूज्ञापक व उद्वाहन निरीक्षक,
उदयोग, उर्जा व कामगार विभाग, अंधेरी (पश्चिम) मुंबई- ५८.

**(आदेश पारीत दिनांक ०७/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.भरतकुमार पी. देवलासी हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विदयुत निरीक्षक, सचिव, अनूज्ञापक व उद्वाहन निरीक्षक, अंधेरी (प), मुंबई श्री.ना.ई. पाटील हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, (सचिव, अनूज्ञापक व उद्वाहन निरीक्षक) अंधेरी (प), मुंबई श्री.एम.जी. तायडे हे हजर आहेत.

अर्जदाराने मागितलेली माहिती अर्जदाराला पुरविण्यात आली व अर्जदाराचे समाधान झाले आहे. अर्जदाराने संबंधित विद्युत निरीक्षक, सचिव अनुज्ञापक व उदवाहन निरीक्षक, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, अंधेरी मुंबई यांचेकडे पर्यवेक्षक दुहेरी परवाना मिळण्याबाबत अर्ज केला व त्यावर त्रुटी असल्याबाबत त्यांना कळविले. उत्तरवादीने अर्जदाराला वेळावेळी पत्र पाठविण्याचा प्रयत्न केला असता सदरचा पत्रव्यवहार परत आला असे उत्तरवादी यांचे म्हणणे आहे. आज सुनावणीचे वेळी अर्जदार हजर आहे व ते व्यक्तिशः माहिती घेण्यास तयार आहे.

वरील बाबी लक्षात घेता सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २७४/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.अशोक गोविंदराव इंगळे,
संपादक, साप्ताहीक योगदर्पण,
मेन रोड, मंगरुळपिर, वाशिम.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
मंगरुळपिर, जि.वाशिम.
**२.** जन माहिती अधिकारी तथा
केंद्र प्रमुख, कुपटा, पंचायत समिती, मानोरा,
जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक ०७/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे केंद्र प्रमुख, कुपटा, पंचायत समिती, मानोरा, श्री.शमीम फरहत हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपिर श्री.एल.एम. राठोड हे हजर आहेत.

सदर प्रकरणात दिनांक २४/११/२००९ नुसार अर्जदाराने मागितलेल्या माहिती संबंधी कुठलेही दस्तऐवज (रेकॉर्ड) कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे माहिती पुरविण्यात आली नाही. तरी, संबंधित प्रकरणात जन माहिती अधिकारी, मंगरुळपिर यांनी अर्जदाराला जी माहिती उपलब्ध असेल किंवा नसेल त्याबाबत आजपासुन १५ दिवसाचे आंत अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर कळवावे. अर्जदार आज रोजी गैरहजर आहे. सदर प्रकरणात अर्जदाराचे समाधान न झाल्यास त्या पत्राविरुध्द प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपिल दाखल करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

गटशिक्षणाधिकारी, मानोरा हे उशिरा हजर झाले व त्यांनी गटशिक्षणाधिकारी, मंगरुळपिर यांना तसेच अर्जदार यांना माहिती कळविण्यात आल्याचे सांगितले.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.२७५ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.राम माधवराव हळदे,
ह.मु.पो.ता. नेर(प.), शिवाजीनगर,
जिल्हा, यवतमाळ.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
यवतमाळ, जि.यवतमाळ.
२. जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेर (प.),
जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक ०७/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तर्फे त्यांचे चिरंजिव श्री.महेश हळदे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, यवतमाळ श्री.एन.के. सुरजुसे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, नेर श्री.एस.व्हि. उंबरकर हे हजर आहेत.

सदर प्रकरणात मुद्दा क्रमांक १ बाबत अर्जदाराने जी माहिती मागितली त्याबाबत तहसिलदार यांचे कार्यालयाने चौकशी करुन अहवाल प्राप्त केला. त्या अहवालाची प्रत अर्जदाराला देण्यात यावी. तसेच त्या अहवालानुसार रॉकेलची उचल अर्जदाराने केलेली नसल्याने सदर रॉकेल दुस-याला देण्यात आले. त्याबाबत अर्जदाराला तक्रार करावयाची असल्यास ते तक्रार नोंदवु शकतात व त्यावर योग्य ती कार्यवाही तहसिलदार करतील अशी अपेक्षा आहे. अर्जदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने अर्जदाराला कळविले आहे. सदरचे पत्र दिनांक १२/११/२००९ ला देण्यात आले. तसेच तहसिलदार, नेर यांनी लेखी निवेदन दाखल केले व त्यात अर्जदाराला दिलेले पत्राचा क्रमांक व तारीख नमुद आहे.

वरील बाबी लक्षात घेता अर्जदाराचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २७६ / २०१०**
**अपिल क्र. २७७ / २०१०**
**अपिल क्र. २७९ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.संजय गोविंदराव इंगळे,
संपादक, दैनिक नमो दयासागर, कार्यालय,
ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय, मंगरुळपिर,
ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.
२. जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय,
मंगरुळपिर, ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.
३. जन माहिती अधिकारी तथा
तलाठी, पिंप्री बु. ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक ०७/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.संजय गोविंदराव इंगळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, मंगरुळपिर, श्री.पि.एल. पवार हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

अर्जदाराने अपिल क्रमांक २७६, २७७,२७९/२०१० या तीनही प्रकरणांत प्रथम अपिल दाखल करुन सुध्दा कुठल्याच प्रकारची सुनावणी जी कायदयाने घ्यायला पाहिजे होती ती अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली नाही. तहसिलदार यांचे म्हणण्यानुसार त्यांचेकडे १०-१२ अपिल अजुनपर्यंत प्रलंबित आहेत व त्याची मुदत सुध्दा संपलेली आहे. त्यापैकी बरेचसे अपिल हे अर्जदाराचे आहे. तरी वरील प्रकरणात ४ आठवडयाच्या आंत सुनावणी घेवुन अर्जदाराला उपलब्ध असलेली माहिती देण्यासाठी व निकाल देण्यासाठी अपिलीय अधिकारी हे तयार आहे व तसे त्यांनी हया आयोगासमोर कबुल केले आहे. माहिती प्राप्त झाल्यानंतरही अर्जदाराचे समाधान झाले नाही तर अर्जदाराला ९० दिवसात व्दितीय अपिल या आयोगासमोर करता येईल.

तसेच अपिल क्रमांक २७७ हया प्रकरणात जन माहिती अधिकारी म्हणुन तलाठी, पिंप्री (बु.) यांचेकडे माहिती मागितली होती व ती माहिती अर्जदाराला देण्यात आली नाही म्हणुन अर्जदाराला दिनांक २९/१२/२००९ नुसार प्रथम अपिल दाखल करावे लागले. तरी, या प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तलाठी यांनी आजपर्यंत माहिती का दिली नाही व त्यांचे म्हणणे ऐकुन त्यात निर्णय दयावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २७८/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.संजय गोविंदराव इंगळे,
संपादक, दैनिक नमो दयासागर, कार्यालय,
ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय, मंगरुळपिर,
ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.
**२**. जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय,
मंगरुळपिर, ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक ०७/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.संजय गोविंदराव इंगळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, मंगरुळपिर, श्री.पि.एल. पवार हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

तहसिलदार तथा अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी म्हणुन अपिल क्रमांक २/२०१० मध्ये आदेश पारीत केला. त्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांना असा आदेश दिला की, दिनांक २४/१२/२००९ च्या अर्जानुसार माहिती अधिकारा अंतर्गत मागितलेली माहिती तसेच उपलब्ध असलेल्या माहितीच्या फी ची रक्कम अपिलार्थी यांना कळवुन आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसाचे आंत अपिलार्थी यांना देवुन अहवाल सादर करावा. तसेच माहिती उपलब्ध नसल्यास तसे अपिलकर्ता यांना कळविण्यात यावे. तरी, याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आजपर्यंत कुठलीही कार्यवाही केलेली नाही व तसेच अपिलीय अधिकारी यांना याबाबत काहीही माहिती नाही. जन माहिती अधिकारी यांना हया आयोगातर्फे नोटीस काढुन ते गैरहजर आहेत. तरी, सदर प्रकरण जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज कलम ७(१) नुसार निकाली काढला नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८/०१/२०१० ला आदेश देवुन सुध्दा दिलेल्या आदेशाचे पालन जन माहिती अधिकारी यांचेकडुन न झाल्याबाबत सकृतदर्शनी सिध्द झाल्याचे दिसुन येते. म्हणुन जन माहिती अधिकारी यांना दोषी ठरविण्यात येवुन या अधिनियमाच्या कलम २०(२) प्रमाणे त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमानुसार शिस्तभंगाच्या कारवाईचा आदेश देण्यात येत आहे. तरी, जिल्हाधिकारी, वाशिम यांनी सदर प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमानुसार कारवाई करुन ३ महिन्याच्या आंत हया आयोगास अहवाल सादर करावा. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हे हजर आहेत व त्यांनी अर्जदाराला माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत मान्य केले आहे. तरी, त्यांनी सदर प्रकरणात आजपासुन १५ दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दयावी तसे न झाल्यास अर्जदार कलम १८ खाली हया आयोगाकडे तक्रार करु शकतात.

खालील आदेश पारित करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**आदेश**

जिल्हाधिकारी, वाशिम यांनी सदर प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करुन ३ महिण्याच्या अंात हया आयोगास अहवाल सादर करावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.**
**जिल्हाधिकारी, वाशिम**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २८० / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.दिनकर महादेवराव मानकर,
मु.खापरी, पो.घाटंजी, ता.घाटंजी, जि.यवतमाळ.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
नागपुर बंगला क्र.३९/१, सिव्हील लाईन, नागपुर.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
विद्युत निरिक्षक, विद्युत निरिक्षक कार्यालय,
यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक ०७/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे उशिरा हजर झालेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपुर श्री.आर.आर. आकुलवार हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा विद्युत निरीक्षक, यवतमाळ श्री.अ.प्र. देशमुख हे हजर आहेत.

अर्जदाराने प्रपत्र 'अ' दिनांक ३०/०९/२००९ रोजी जन माहिती अधिकारी, श्री.तायडे, विद्युत निरीक्षक, यवतमाळ यांचेकडे अर्ज करुन दिनांक २९/०६/२००९ रोजी ताडसावळी येथे विजेचा धक्का लागुन मय्यत झालेल्या सुशिला पेंटावार या महिलेच्या मृत्युबाबतचा चौकशी अहवाल तसेच स्थळ निरीक्षणाच्या वेळी हजर असलेले सरपंच पोलीस पाटील पंचाचे तसेच विज कंपनीचे अधिकृत/अनधिकृत अधिकारी/कर्मचारी यांचे घेण्यात आलेल्या बयाणाच्या प्रमाणित प्रती मागितल्या. सदर माहिती न मिळाल्यामुळे प्रपत्र 'ब' नुसार दिनांक २०/११/२००९ ला प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलामध्ये अर्जदाराला दिनांक १५/१२/२००९ ला हजर राहण्याबाबत कळविले होते परंतु अर्जदार हजर झाले नाही तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८/१०/२००९ ला दिलेली माहिती योग्य आहे व अपिल खारीज करण्यात आले. तसेच अर्जदाराला सदर प्रकरणात अहवाल पोलीस स्टेशन व न्यायालयात सादर करावयाचे आहे व प्रकरणात निकाल लागेपर्यंत दस्तदेवज माहितीकरिता खुले करता येणार नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले.

परंतु हयाबाबत संबंधीत कार्यालयाची चौकशी पुर्ण झाल्यामुळे अर्जदाराला माहिती पुरविणे गरजेचे आहे. सदर प्रकरणात दिनांक ३०/१२/२००९ रोजी चौकशी अहवाल तयार झालेला आहे व त्यामुळे आता चौकशी बाबत कुठलाही परिणाम होणार नाही त्यामुळे संबंधित सरपंच पोलीस पाटील व इतर यांचे बयाणाच्या प्रती अर्जदाराला पुरविण्यास काहीही हरकत नाही. सदर प्रकरणात दिनांक ३०/१२/२००९ रोजी चौकशी पुर्ण झाल्याचे उत्तरवादी यांनी सांगितले आहे. तरी, सदर प्रकरणात अर्जदाराला माहिती तयार असल्याचे कळवुन अर्जदाराला माहिती विनाशुल्क पुरविण्यात यावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २८२/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.जयंत विठ्ठलराव वंजारी,
१४/अ, उर्जा कॉलनी, व्हि.एम.व्हि. रोड,
अमरावती ४४४४०६.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अप्पर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय,
मुंबई यांचे कार्यालय

२. जन माहिती अधिकारी तथा
अप्पर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय,
मुंबई यांचे कार्यालय

**(आदेश पारीत दिनांक ०७/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.जयंत विठ्ठलराव वंजारी हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृहविभाग, मंत्रालय, मुबई हे गैरहजर आहेत.
जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणी मिळणेबाबत दिनांक ०६/१२/२०१० रोजी अर्ज केला आहे. सदर प्रकरणात अर्जदाराने जे अपिल दाखल केले ते माहिती न मिळाल्यामुळे दाखल केले. त्यात अर्जदाराला ७ जुन २०१० चे पत्राची प्रत मिळाली व त्यात अर्जदाराला जी कार्यवाही अपेक्षित होती त्याबद्दल दिनांक ०४/०२/२०१० अन्वये उघड चौकशी करण्याबाबत महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना परवानगी देण्यात आली आहे. तरी, सदर प्रकरणात दिनांक ०४/०२/२०१० च्या संबंधित जो आदेश पारित करण्यात आला त्या आदेशाची प्रत अर्जदाराला अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसाचे आतं पाठविण्यात यावी.

वरील बाबी लक्षात घेता सदर प्रकरण पुढील तारखेला ठेवण्याचा प्रश्न उद्भवत नाही म्हणुन सदर प्रकरण निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत, आदेश पाठविण्याच्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २८१ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.जयंत विठ्ठलराव वंजारी,
१४/अ, उर्जा कॉलनी, व्हि.एम.व्हि. रोड,
अमरावती ४४४६०४.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत
यांचे कार्यालय, शहर उपविभाग १, अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत,
शहर उपविभाग क्र.१, अमरावती जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक ०७/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.जयंत विठ्ठलराव वंजारी हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

अर्जदाराने जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, शहर उपविभाग क्र.१, अमरावती यांचेकडे दिनांक ०४/१२/२००९ रोजी प्रपत्र 'अ' नुसार अर्ज करुन ४ मुद्दयात माहिती मागितली. ती माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने त्यानंतर १ महिन्याने प्रथम अपिलीय यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. त्यानंतर प्रथम अपिलामध्ये दिनांक २३/०१/२०१० रोजी मुद्दा क्रमांक ४ व २ ची अर्धवट देण्यात आलेली माहिती पुरविण्यात येईल असे सुनावणी दरम्यान कबुल करुन सुध्दा माहिती दिली नाही. अर्जदाराला दिनांक १६/०१/२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी ३६००/- रु. चा भरणा करण्याबाबत पत्र दिले व त्यावरुन अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना असे सांगितले की, मला इतक्या रुपयाची माहिती नको, मला आवश्यक असलेली माहितीचे निरीक्षण दिल्यास जी माहिती पाहिजे त्या माहितीच्या खर्चाकरिता पैसे भरण्यास तयार आहे व ती माहिती पुरविण्यात यावी असे अर्जदाराने सांगितले. याबाबत अपिलीय अधिकारी यांच्याशी चर्चा करुन सुध्दा व सदर प्रकरणात अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३/११/२०१० रोजी ११.०० वाजता सुनावणी घेवुन सुध्दा झालेल्या आदेशाची प्रत अर्जदाराला दिलेली नाही व माहिती सुध्दा पुरविण्यात आली नाही. आज रोजी उत्तरवादी हे गैरहजर आहेत. तरी, सदर प्रकरणात अर्जदाराला ठरल्याप्रमाणे माहिती आजपासुन १५ दिवसाचे आंत अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर विनाशुल्क देण्यात यावी. तसेच अर्जदाराला झालेल्या शारीरिक व मानसिक त्रासाबद्दल रु.२०००/- (रु.दोन हजार फक्त) प्राधिकरणातर्फे अदा करण्यात यावे व सदरची रक्कम आजपासुन ६ आठवडयाच्या आंत रोख किंवा डिमांड ड्राफ्टव्दारे अर्जदाराला देण्यात यावी. अर्जदाराला माहिती मिळाली नाही तर अर्जदार कलम १८ खाली हया आयोगासमोर तक्रार करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २८३ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.रामचंद्र गणपत पल्हाडे,
(सेवानिवृत्त शिक्षक), मु.पो.पळशी बु.
ता.खामगांव, जि.बुलडाणा.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
बुलडाणा, जि.बुलडाणा.
**२**. जन माहिती अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
देऊळगांव राजा, जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ०७/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.रामचंद्र गणपत पल्हाडे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथ), जिल्हा परिषद, बुलडाणा श्री.ए.ब. राउळ हे हजर आहेत. जन माहिती तर्फे अधीक्षक, पंचायत समिती, देऊळगांव राजा, श्री.डि.व्ही. पेचरवाल हे हजर आहेत.

अर्जदार हे मुख्याध्यापक म्हणुन दिनांक ३०/०९/१९९४ मध्ये निवृत्त झाले. अर्जदाराला अंतरिम वाढ, प्रवास भत्ता बाबतचे देयक मिळाले नाही म्हणुन अर्जदाराने प्रपत्र 'अ' नुसार दिनांक १५/०७/२००९ ला गटविकास अधिकारी, पं.स. देऊळगांव राजा यांचेकडे अर्ज केला. सदर प्रकरणात अर्जदार हे खामगांव, पंचायत समिती येथुन निवृत्त झाले व त्यावेळचे त्यांना पेंशन व इतर बेनिफिट देण्यात आले आहे व अंतरिम वाढ ही १८८४ च्या शासन परिपत्रकानुसार देय आहे त्याबाबत त्यांनी खामगांव, पंचायत समितीकडे अर्ज केल्यास त्यांना मिळु शकते असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला सदरची अंतरिम वाढ त्यांचेकडुन देय होणार नाही. तरी हयाबाबत पंचायत समिती, खामगांव यांचेशी संपर्क साधावा याबाबत अर्जदाराला लेखी पत्र आजपासुन ८ दिवसाचे आंत देण्यात यावे, जेणेकरुन अर्जदार खामगांव, पंचायत समिती कडे अंतरिम वाढ बद्दल लेखी निवेदन दाखल करुन शकतील.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.२८४ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.संदिप प्रकाश गाडेकर,
गांधीनगर, वार्ड नं.६, चिखली,
ता.चिखली, जि.बुलडाणा.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा,
ता.जि. बुलडाणा.
**२**. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती,
कार्यालय, चिखली, ता.चिखली, जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ०७/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.संदिप प्रकाश गाडेकर हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चिखली श्री.जि.पी. साबळे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा (प्रभारी) सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, चिखली, श्री.डि.एस. इंगळे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराला मागितलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी विरोध केला त्यासाठी त्यांनी हया आयोगाने दिलेला अपिल निर्णय १४४१/२००८ दिनांक ०१/१०/०९ नुसार सदरची संस्था ही सहकारी कायदयाखाली रजिष्टर झालेली संस्था आहे व त्या संस्थेला सरकारचे अनुदान मिळत नाही म्हणनु अशा संस्था सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत बसत नाही असा निर्णय दिल्यामुळे अपिल खारीज करण्यात आले. हा निर्णय कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगांव बाबत दिलेला होता. त्याचा आधार घेवुन कृषी उत्पन्न बाजार समिती, चिखली यांनी माहिती पुरविली नाही. परंतु त्यानंतर हया आयोगाने मुंबई, उच्च न्यायालयाने वेगवेगळया प्रकरणात दिलेला निर्णयाने जी संस्था कायदयानुसार स्थापीत झाली असेल अशा सर्व संस्था सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याखेत बसतात तसेच महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियम) १९६३ साली पारित केलेली संस्था आहे व त्या अधिनियमानुसार सदरची संस्था अस्तित्वात आली आहे त्यामुळे सदरची संस्था ही सार्वजनिक प्राधिकरणात बसते किंवा अधिनियमाच्या कलम २(एच) मध्ये बसते. म्हणुन कृषी उत्पन्न बाजार समिती हया संस्थेला माहितीचा अधिकारात माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच हया संबंधी पणन संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संस्थांनी त्यांचे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी नेमावा अशा सुचना दिल्या त्याचा विचार करुन संबंधित संस्था ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याखेत बसते म्हणुन हा आयोग या निष्कर्षाप्रत आलेला असुन अर्जदाराला माहिती देणे अनिवार्य आहे, तरी कृषी उत्पन्न बाजार समिती, चिखली यांनी अर्जदाराला माहिती देण्याचे कबुल केले व आजपासुन १५ दिवसात माहिती देण्याचे मान्य केले व सदरची माहिती विनाशुल्क पुरविण्यात यावी. तसेच अर्जदाराला निरीक्षण देवुन माहिती तपासुन घेतल्यास कमी खर्च लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्जदाराला निरीक्षण देवुन १५ दिवसांचे आंत माहिती देण्यात यावे. निरीक्षणाची तारीख व वेळ अर्जदाराशी सल्ला मसलत करुन ठरविण्यात यावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**